The Berar General Education Society's


# SITABAI ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, AKOLA

*(NAAC Reaccredited "A" grade)*

University Grants Commission, Sponsored
One Day National Conference
*On 30 January 2018*

# Economical Study of Regional Disparity in India

Special issue of an International
**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES**
IMPACT FACTOR **SJIF (2016)-6.177**
ISSN : 2349 – 4766 (P), ISSN : 2278-8808 (E)



**Editor**
**Dr. Prasannajit R. Gawai**

VOL-3

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 143 | स्वतंत्र विदर्भ राज्य चळवळीचा ऐतिहासिक आढावा<br>*प्रा. संतोष गो. कुळकर्णी* | 515-517 |
| 144 | मराठीच्या बोली : एक प्रादेशिक समन्वय<br>*डॉ. हरिदास देवीदास आखरे* | 518-519 |
| 145 | महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचा सामाजिक असमतोल<br>*प्रा. दिलीप दामू कुमरे* | 520-521 |
| 146 | महाराष्ट्रातील लोकसंगीताचा प्रादेशिक विकास<br>*प्रा. नाना व्ही. भडके* | 522-524 |
| 147 | ग्रामीण अर्थव्यवस्था, व तिच्या भारतातील भूमिका<br>*प्रा. पुरूषोत्तम बांडे* | 525-526 |
| 148 | लहान घटक राज्यांच्या संदर्भात भाषेतील क्षेत्रीय असमानता<br>*प्रा. हरिचंद्र नागसू नरेटी* | 527-528 |
| 149 | क्षेत्रीय विषमतेमुळे होणाऱ्या विदर्भातील शेतकरी आत्महत्यांचे अध्ययन<br>*प्रा. सुनिल प्रल्हाद गायगोळ* | 529-534 |
| 150 | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल<br>*प्रा. डॉ. प्रदिप वि. ताकतोडे* | 535-536 |
| 151 | स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीचा अस्तित्व बोध<br>*प्रा. डॉ. बी. एस. वझिरे* | 537-539 |
| 152 | वैदर्भिय अर्थकारण –एक अभ्यास<br>*प्रा. डॉ. निलिमा दिगांबर कापसे* | 540-541 |
| 153 | महाराष्ट्राचा प्रादेशिक असमतोल<br>*प्रा. डॉ. वसंत नानाराव पतांगे* | 542-545 |
| 154 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लहान राज्याविषयीचा दृष्टीकोण<br>*डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड* | 546-548 |
| 155 | स्वतंत्र विदर्भ राज्य : महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचा आढावा<br>*प्रा. डॉ. धर्यवर्धन ह. पुंडकर & प्रा. दिलीप ह. सूर्यवंशी* | 549-550 |
| 156 | वैदर्भीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय<br>*प्रा. डॉ. दिनकर उंबरकर* | 551-554 |
| 157 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लहान राज्यविषयक भूमिका<br>*प्रा. डॉ. ममता इंगोले महल्ले* | 555-559 |
| 158 | डॉ. आंबेडकरांचे केंद्र व छोटया राज्याचे सार्वजनिक आय–व्यय संबंधी विचार<br>*प्रा. डॉ. ममता आर. साहू* | 560-561 |
| 159 | महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक असमतोलाचे अध्ययन<br>*प्रा. डॉ. संतोष उ. धामने* | 562-563 |
| 160 | विदर्भ राज्याची मागणीची कारणमीमांसा<br>*प्रा. डॉ. सुरेश पंडीत* | 564-565 |
| 161 | रियाजाचे महत्व<br>*प्रा. डॉ. पी. आर. सुपळकर* | 566-567 |
| 162 | औद्योगिक क्षेत्रातील असंघटीत कामगारांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन<br>*प्रा. योगेश कराळे* | 568-569 |
| 163 | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल निर्माण होण्याची कारणे<br>*प्रा. प्रतिभा येवले (म्हातारमारे) & प्रा. शितल ताथोड (ठाकरे)* | 570-571 |


Scanned by CamScanner

153.

# महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल

**Dr. Vasant Nanarao Patange**

*HOD (Asst.Prof.) Business Economics & Banking A.R.B.Garud College,Shendurni Tq- Jamner*

**प्रस्तावना–** निसर्गाने प्रत्येक देशाला काही विशेष वरदान देवून समानतेचा प्रत्येय दिला. मात्र निसर्गाने दिलेल्या साधन सामग्रीचा कार्यक्षमतेने वापर करून किंवा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विकासाच्या उच्चतम दर काही देशांनी गाठला मात्र काही देशांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. प्रादेशिक असमतोलाची समस्या जागतिक स्तरावरही भेडसावत आहे. अनेक देशात या समस्येने उग्ररूप धारण केले आहे. भारतातही प्रादेशिक असमानता मोठ्या प्रमाणात दिसून येते. भारतातील काही राज्यांचा विकास जास्त झाला आहे तर काही राज्य पायाभूत सेवांपासूनही वंचित आहेत. भारतातील पंजाब, हरियाणा या राज्यांचा कृषी विकास जलसिंचन सुविधांमुळे इतरांच्या तुलनेत जास्त झाला आहे. तर महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू इ. राज्य औद्योगिक दृष्ट्या विकसित आहेत. बिहार, अरुणाचल प्रदेश या राज्यांमध्ये नैसर्गिक साधनसामग्री विपुल प्रमाणात आहे मात्र त्यांचा विकास वेगाने झाला नाही. भारतातही काही राज्यात रेल्वे वाहतुकीला सुरुवातही झाली नाही. मात्र महाराष्ट्र, दिल्ली सारख्या राज्यात मेट्रो सारखी वेगवान रेल्वे वाहतूक सुरु झाली व बुलेट ट्रेन प्रस्तावित आहे. केंद्र सरकार दर पाच वर्षांनी वित्त आयोग नेमून राज्यनिहाय महसूल विभागणी करते या वित्त आयोगातही सधन राज्यांनाच अधिक प्राधान्य दिले जाते त्यामुळे प्रादेशिक असमतोल कमी होण्याऐवजी वाढत आहे.

**अध्ययनाची उद्दिष्टे–**

1. प्रादेशिक असमतोलाचा अर्थ स्पष्ट करणे.
3. महाराष्ट्राच्या प्रादेशिक असमतोलाचे अध्ययन करणे.
4. प्रादेशिक असमतोल या समस्येवर उपाय सुचविणे.

**प्रादेशिक असमतोल–** देशातील विविध राज्यात, राज्यातील विविध विभागात विकासाच्या दृष्टीने किंवा इतर दृष्टीने जी तफावत निर्माण होते त्याला प्रादेशिक असमतोल असे म्हणतात. देशाअंतर्गत व राज्यांअंतर्गत असमान विकास होणे म्हणजे प्रादेशिक असमतोल होय. दरडोई उत्पन्न, दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या,औद्योगीकरण, कृषीक्षेत्रातील जलसिंचन, वीज इ. सुविधा आणि शिक्षण, आरोग्य व इतर पायाभूत सुविधांची उपलब्धता या आधारे प्रादेशिक असमतोल ही संकल्पना अधिक स्पष्ट करता येते.

महाराष्ट्रातील विभाग निहाय साक्षरता दर (2011) :–

जनगणना वर्ष 2011 नुसार महाराष्ट्राची लोकसंख्या 1123740000 आहे व दशवार्षिक वाढीचा दर 16 टक्के असा आहे. (दशवार्षिक वृद्धी दर 2001 ते 2011) महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत मराठवाड्याची लोकसंख्या 18732000 असून (महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या 17टक्के ) दशवार्षिक वाढीचा दर 19.9 टक्के आहे व हा दर महाराष्ट्रापेक्षा तर अधिक आहेच मात्र हा दर इतर सर्व कोकण, नाशिक, पुणे,अमरावती व नागपूर विभागांपेक्षाही जास्त आहे.मराठवाड्यातील लोकसंख्या वाढीचा दर जास्त आहे मात्र त्या तुलनेत साक्षरता दर व रोजगार इतर विभागांच्या तुलनेत कमी आहे.**तक्ता क्र.1**

**विभाग निहाय महाराष्ट्रातील साक्षरता दर (2011)**

| अ क्र. | विभाग | साक्षरता दर (टक्के) |
|---|---|---|
| 1 | कोकण | 86.6 |
| 2 | नाशिक | 78.0 |
| 3 | पुणे | 82.7 |
| 4 | मराठवाडा | 76.4 |
| 5 | अमरावती विभाग | 85 |
| 6 | नागपूर विभाग | 84.5 |
| | **महाराष्ट्र** | **82.3** |

**स्त्रोत** – महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2016–17

महाराष्ट्रातील लोकसंख्या वाढीचा दर लक्षात घेता तो मराठवाड्यात सर्वाधिक असून साक्षरता दर मात्र सर्व विभागात कमी असल्याचे तक्ता क्र. 1. वरून दिसून येते तक्ता क्र 1 मध्ये दर्शविल्या प्रमाणे 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची साक्षरता 82.3 टक्के आहे ती राष्ट्रीय स्तरावरील साक्षरतेपेक्षा अधिक आहे.



Scanned by CamScanner

**मानव विकास निर्देशांक –** मानव विकास निर्देशांक शिक्षण, रोजगार, लोकांचे आयुर्मान या आधारावर काढला जातो.2016 मध्ये भारताचा मानव विकास निर्देशांक 0.624 असून भारताचा 131 वा क्रमांक आहे. महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक 2011 मध्ये 0.752 होता तो उच्चस्थिती दर्शविणारा आहे. महाराष्ट्रातील जिल्हा निहाय किंवा विभाग निहाय मानव विकास निर्देशाकाची तुलना केल्यास मराठवाड्यातील औरंगाबाद हा जिल्हा वगळता उर्वरीत सर्वच जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक 0.671 पेक्षा कमी असून तो अल्पस्थिती दर्शविणारा आहे.तर केवळ औरंगाबाद जिल्ह्याचा (0.727) मानव विकास निर्देशांक उच्च स्थिती दर्शविणारा आहे. या शिवाय विदर्भ व उत्तर महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक हा अल्प किंवा मध्यम स्थिती दर्शविणारा आहे. यावरून हेच सिद्ध होते की मराठवाडा अजून ही मानव विकासाच्या दृष्टीने पिछाडलेला आहे. मराठवाड्याच्या मानव विकासाच्या दृष्टीने प्रामाणिक प्रयत्न झाल्यास मानव विकास निर्देशांकात निश्चित वाढ होण्यास मदत होईल.आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानव विकास निर्देशांकात भारताची जी अवस्था आहे. त्याही पेक्षा वाईट अवस्था महाराष्ट्रात मराठवाड्याची आहे.

**रोजगार विषयक माहिती–** जीवनमान उंचावण्यासाठी उत्पन्न अधिक असणे आवश्यक आहे आपल्या किमान गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्येकाला सहजतेने रोजगार उपलब्ध झाला पाहिजे. मराठवाडा व विदर्भ या विभागांमध्ये विविध आस्थापनामध्ये अनुशेष आहे तो अजूनही पूर्ण केला जात नाही मराठवाड्यात औरंगाबाद वगळता उर्वरित जिल्ह्यात उद्योग नगण्य असल्यामुळे रोजगाराचे प्रमाण कमी आहे. मराठवाड्यात व विदर्भात कोरडवाहू शेतीचे प्रमाण जास्त असल्यामुळे तेथेही हंगामी रोजगार निर्माण होतो. सहावी आर्थिक गणनेनुसार (2013–14) विभाग निहाय रोजगार विषयक माहिती तक्ता क्र 2 मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र. 2**

विभाग निहाय रोजगार 6 वी आर्थिक गणना (2013–14)

| अ क्र. | विभाग | एकूण रोजगार (लाखात) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | कोकण | 46.7 | 32.18 |
| 2 | नाशिक | 16.8 | 11.58 |
| 3 | पुणे | 46 | 31.70 |
| 4 | मराठवाडा | 14.8 | 10.20 |
| 5 | विदर्भ | 20.8 | 14.33 |
| | **महाराष्ट्र** | **145.1** | **100** |

**स्त्रोत**– अर्थ व सांखिकी संचालनालय महाराष्ट्र शासन

तक्ता क्र. 2 नुसार 6 व्या आर्थिक गणनेनुसार सर्वाधिक रोजगार अनुक्रमे कोकण– 46.7 लाख (32.18 टक्के) व पुणे– 46 लाख (31.70 टक्के) या दोन विभागात असून कोकण व पुणे विभागातील रोजगाराचे प्रमाण महाराष्ट्राच्या 64 टक्के आहे. मराठवाद्यात ते केवळ 10.20 टक्के आहे. मराठवाड्यात रोजगाराच्या संधी खूप कमी असल्यामुळे स्थलांतराचे प्रमाण जास्त आहे हे स्थलांतर थांबविण्यासाठी मराठवाड्यात अधीकाधिक रोजगार निर्माण करणे आवश्यक आहे.

**विभाग निहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची माहिती –** भारतात औद्योगीकरण झालेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचा अव्वल क्रमांक आहे. मात्र महाराष्ट्रात जो औद्योगिक विकास झाला आहे त्यात प्रादेशिक विषमता जास्त आहे. महाराष्ट्राचा औद्योगिक विकास मुंबई सभोवतालच (नाशिक, पुणे ) अधिक झाला आहे. उर्वरित बहुतेक विभाग मात्र या औद्योगिक विकासापासून वंचित राहिला आहे. विभाग निहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची माहिती तक्ता क्र. 3 मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र. 3**

**विभाग निहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची माहिती (2015)**

| अ क्र. | विभाग | सूक्ष्म,लघु व मध्यम उपक्रम | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | कोकण | 24786 | 10.2 |
| 2 | नाशिक | 39269 | 16.1 |
| 3 | पुणे | 27458 | 11.3 |
| 4 | मराठवाडा | 92233 | 37.8 |
| 5 | विदर्भ (अमरावती व नागपूर) | 18751 | 7.7 |
| | महाराष्ट्र | 41224 | 100 |

**स्त्रोत**– उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन



Scanned by CamScanner

सूक्ष्म,लघु व मध्यम उपक्रमांची संख्या विभाग निहाया सर्वाधिक पुणे विभागात 92233 (37.8 टक्के) आहे. बृहन्मुंबई व कोकण या विभागांची संख्या अनुक्रमे 24786(10.2टक्के ) व 39269 (16.1 टक्के ) असून ती एकत्रित केल्यास जास्त आहे. विदर्भातील नागपूर व अमरावती विभागातील उपक्रमांची एकत्रित संख्या– 41224 (16.9 टक्के) आहे. महाराष्ट्रात सर्वात कमी उपक्रमांची संख्या मराठवाडा विभागात 18751 (7.7 टक्के) आहे. उर्वरित सर्व विभागांची संख्या यापेक्षा जास्त आहे. यावरून असे स्पष्ट होते की, मराठवाड्यात सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची संख्या तुलनेने कमी आहे.

**मराठवाडा व विदर्भातील अनुशेष –** मागासलेल्या मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्र या भागांसाठी घटनेच्या 371(2) च्या कलमानुसार वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्यात आली. मराठवाडा व विदर्भाचा अनुशेष मात्र अद्याप भरून काढलेला नाही. मराठवाडा व विदर्भावर सिंचनामध्ये झालेल्या निधी वाटपात अन्याय झाला असून तो 70 वर्षानंतरही दूर झालेला नाही. 5 सप्टेंबर 2011 रोजी मराठवाडा व विदर्भाचा सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी राज्यपालांच्या आदेशानुसार आदेश काढण्यात आला. मराठवाडा व विदर्भाचा अनुशेष दूर करण्यासाठी सिंचन व सिंचनेत्तर क्षेत्रांच्या विकासासाठी निधी वाटपाचे अधिकार राज्यपालांना देण्यात आले मात्र मागास भागाना निधी देण्याचे राज्यपालांच्या आदेशाचे पालन होत नाही हे दुर्दैवच म्हणावे लागेल. 1983 मध्ये दांडेकर समितीच्या अहवालानुसार मराठवाड्याचा अनुशेष 751 कोटी होता. 1994 ते 2000 या काळात अनुशेष समितीने दिलेल्या अहवालानुसार, अनुशेष–4005 कोटींवर पोहचला होता. 2011 मध्ये केळकर समितीच्या अहवालानुसार मराठवाड्याचा अनुशेष 15 हजार 63कोटी होता तर 2017 मध्ये मराठवाड्याचा अनुशेष 20 हजार कोटींवर आहे. सिंचन होऊ शकणारे क्षेत्र 59.30 लाख हे.आहे. आजवर केवळ 10.01 लाख हे क्षेत्रातच सिंचन निर्मिती होऊ शकली आहे. मराठवाडा व विदर्भावर होणाऱ्या या सततच्या अन्यायामुळे वेगळ्या राज्यांची मागणी जोर धरत आहे.

**केळकर समिती** –प्रादेशिक असमतोल व अनुशेष दूर करण्यासाठी वित्त आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली या समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला त्यात 146 शिफारशी त्यांनी शासनाकडे केल्या आहेत. त्यातील काही ठळक बाबी – केळकर समितीच्या अहवालानुसार विदर्भाचे दरडोई उत्पन्न राज्यातील इतर विभागांची तुलना करता 27 टक्क्यांनी कमी आहे. विदर्भाचा विकास इतर विभागांच्या तुलनेत 39 टक्क्यांनी कमी आहे व मराठवाड्याचा विकास 37 टक्क्यांनी कमी आहे. केळकर समितीच्या शिफारशी नुसार विदर्भ व मराठवाड्याच्या सर्वांगीण व संतुलित विकासासाठी विभागीय मंडळाची स्थापना करून विकास व नियोजनाची जबाबदारी त्या मंडळांवर सोपवावी. उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भ व मराठवाड्याला अर्थसंकल्पात केली जाणारी तरतूद कमी असून ती वाढवावी, विदर्भातून मोठ्या प्रमाणात कोळसा खाणी असुन त्यांचा अधिका धीक फायदा विदर्भ व्यतिरिक्त उर्वरित महाराष्ट्राला होतो तो अधिकाधिक विदर्भाला व्हावा व त्या त्या क्षेत्रातून खनिज संपत्तीच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न त्या विभागाच्या विकासासाठी खर्च करण्यात यावे अशी शिफारस केली आहे. मराठवाडा व विदर्भासारख्या मागास विभागांना कृषी व उद्योगांचा विकास होण्यासाठी कमी दरात वीज उपलब्ध करून द्यावी. अशा अनेक शिफारशी केळकर समितीने केल्या असून मराठवाडा व विदर्भाचे वास्तव चित्रण आपल्या अहवालातून समोर आणले आहे.

**निष्कर्ष –**

1. महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्याची साक्षरता व मानव विकास निर्देशांक कमी आहे.
2. महाराष्ट्रातील विभाग निहाय रोजगाराची तुलना करता मराठवाड्यातील एकूण रोजगार 14.8 लाख (10.20टक्के ) असून तो इतर विभागांच्या तुलनेत कमी आहे.
3. महाराष्ट्रातील विभाग निहाय सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची संख्या 2015 मध्ये इतर विभागांच्या तुलनेत मराठवाड्यात 18751 (7.7 टक्के) अतिशय कमी आहे.
4. दांडेकर समिती, अनुशेष समिती व केळकर समिती या सर्वांच्या अहवालानुसार मराठवाडा व विदर्भात मोठा अनुशेष आहे.
5. मराठवाडा व विदर्भातील अनुशेष दूर करण्यासाठी विभागांना दिले जाणारे विकास निधी वाटपाचे अधिकार राज्यपालांना देऊनही राज्यपालांच्या आदेशांचे पालन केले जात नाही.
6. जलसिंचन सुविधा कृषी उत्पादकता वाढीसाठी व कृषीच्या शाश्वत विकासाच्या महत्वपूर्ण घटक आहे मात्र विदर्भ व मराठवाड्यावर जलसिंचन सुविधांबाबत अन्याय झाला आहे. त्याचा परिणाम म्हणून मराठवाडा–विदर्भात कोरडवाहू शेतीचेच प्रमाण जास्त असल्यामुळे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण या दोन विभागात सर्वाधिक आहे. विदर्भाची तर ओळखच शेतकरी आत्महत्यांमुळे होत आहे.
7. मराठवाडा व विदर्भाचे उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत दरडोई उत्पन्न, विकास दर कमी आहे.

**शिफारशी –**



Scanned by CamScanner

1. डॉ. विजय केळकर समितीने केलेल्या शिफारशी अमलात आणणे.
2. मराठवाडा व विदर्भाच्या विविध घटक व विकास दरांची तुलना करतांना महाराष्ट्राच्या सरासरीच्या तुलनेत न करता उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत करून उपाय योजना करणे.
3. मराठवाडा व विदर्भाचा जलसिंचन अनुशेष दूर करण्यासाठी या विभागाला अधिक निधी प्रत्यक्षात उपलब्ध करून देणे व त्या निधीची वास्तव उपलब्धता झाली किंवा नाही याची वेळोवेळी खात्री करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील तज्ञांची किंवा निवृत्त न्याधीशांची नेमणूक करणे.
4. मराठवाड्यात व विदर्भात उद्योजकांचा विकास करण्यासाठी दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.
5. कृषी निगडीत उद्योग या विभागांमध्ये यावेत यासाठी शासन स्थरावर विशेष प्रयत्न करणे.
6. रोजगारांच्या संधी अधिक निर्माण करण्यासाठी नवीन उद्योग व गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन योजना राबविणे व ही गुंतवणूक व उद्योग प्रत्येक जिल्ह्यात येतील यासाठी प्रयत्न करणे.
7. केवळ समित्या किंवा महामंडळ स्थापन करून या विकासाचा विकास होणार नाही तर त्या समित्यांना प्रत्यक्ष कार्य करण्याचीही संधी मिळावी.
8. मराठवाडा व विदर्भातील लोकप्रतिनिधीनी केवळ बघ्यांची भूमिका न घेता या विभागांचा अनुशेष दूर करून या विभागांना प्रगती पथावर आणण्यासाठी आपले राजकीय वजन खर्ची करावे व वैयक्तिक हेवेदेवे बाजूला ठेवून प्रामाणिक प्रयत्न करावे.

**सारांश–**

वरिल सर्व विश्लेषणावरून महाराष्ट्रात विभागीय असमतोल मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते यात मराठवाडा व विदर्भ दुर्लक्षित विभाग आहेत असेच म्हणावे लागेल. त्यामुळे स्वतंत्र विदर्भ व मराठवाड्याची भावना लोकांच्या मनात बळावत चालली आहे. या विभागातील संसाधनाचा किंवा संपतीचा उर्वरित महाराष्ट्राच्या विकासात मोठे योगदान आहे. या दोन्ही विभागांच्या मागासलेपनासाठी राजकीय नेतृत्व हे कारण अनेकवेळा दिले जाते मात्र प्रत्यक्षात या दोन्ही विभागातील राजकीय नेत्यांकडेच बराच काळ महाराष्ट्राचे नेतृत्व राहिले आहे हे दुर्लक्षून चालणार नाही. मराठवाडा व विदर्भातील शेतकरी आत्महत्या, निम्न मानव विकास निर्देशांक, गरिबी, कृषी व उद्योग मागासलेपण इ. समस्या सोडवायच्या असतील तर शासनस्तरावर कोणताही भेदभाव न करता प्रामाणिक प्रयत्नांची गरज आहे.
अन्यथा असे म्हणावे लागेल की मागासलेल्या विभागांचा प्रगतीशील महाराष्ट्र माझा!

**संदर्भ सूची–**

*1.रुद्र दत के. पी. एम. सुंदरम 2005, भारतीय अर्थव्यवस्था, एस चंद एंड कं. ली, नवी दिल्ली.*
*2. महाराष्ट्राची आर्थीक पाहणी 2016–17*
*3.मानव विकास अहवाल, यशदा, पुणे*
*4. महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे आणि भारतातील राज्यांचे निवडक निर्देशक 2014–15, अर्थ व सांखिकी संचनालय , महाराष्ट्र शासन, मुंबई.*
*5. डॉ. विजय केळकर समितीचा अहवाल*
*6.दै. महाराष्ट्र टाईम्स, नवभारत टाईम्स, लोकसत्ता*
*7. विकिपीडिया*



Scanned by CamScanner

# The Berar General Education Society's
# Sitabai Arts, Commerce & Science College, Akola





**Dr. R. D. Sikchi**
**Principal & Convener**



**Dr. Prasannajit R. Gawai**
**Hod Of Economics &**
**Organizing Secretary**

SRJIS

**SCHOLARLY RESEARCH JOURNALS**

Sr No 5+4/5+4, TCG'S Sai Datta Niwas, Phase-II, Wing-D, Flat No. 104,
Near Telco Colony, Jambhulwadi Road, Dattanagar, Ambegaon (kh), Pune-46,
Website: www.srjis.com, Email : dryashdnet@gmail.com

Scanned by CamScanner